महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

सी.आय.एन.क्र. यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४६

# अधिक्षक अभियंता अउदा (संवसु) मंडळ नागपूर यांचे कार्यालय

---

अअ/अउदा/संवसु/मं/नाग/तांत्रिकं/लॉटरी बैठक:-**२७१७** दिनांक:- **२६.१०.२०१८**

**विषय:-**_सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता अंतर्गत वर्ग ब १ यांना लॉटरी पध्दतीने कामे वाटप करण्यासंबंधी चवथी लॉटरी बैठक भंडारा व गोंदिया जिल्हा करिता (२०१८-१९) बैठक दि.०२.११.२०१८ (शुक्रवार) ला घेणे बाबत.

**संदर्भ:-** १) I, E & L Dept. GoM GR No. Misc-2015/CR-63/Energy-5 Dt. 26/03/2015.

२) MSETCL/CO/Tr. O&M/SE-II/EE-VIII/12883 Dt. 05/12/2016.

३) C.O letter vide no. 1046 dt. 25.01.2018

सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांना विनास्पर्धा थेट लॉटरी पध्दतीने कामे वाटपाची योजना महाराष्ट्र शासनाच्या निर्णय संदर्भ क्र. (१) अन्वये अधीन राहून महापारेषण कंपनीने संदर्भ क्र. (२) अन्वये लागू केली आहे.

सदर परिपत्रकाला अनुसरून अधिक्षक अभियंता अउदा (संवसु) मंडळ नागपूर यांचे कार्यालयात सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांची नोंदणी सुरु आहे.

सदरील नोटीस हि दि. २६.१०.२०१८ (शुक्रवार) रोजी प्रसिध्दीस देण्यात येत असून , प्रसिध्दीच्या दिनांकापासून दि.०२.११.२०१८ (शुक्रवार) पर्यंत महापारेषण कंपनीच्या संकेतस्थळावर तसेच अउदा (संवसु) मंडळ नागपूर या कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्दीस्तव उपलब्ध असेल.

या योजने अंतर्गत अधिक्षक अभियंता अउदा (संवसु) मंडळ नागपूर या कार्यालयात दि.०२.११.२०१८ (शुक्रवार) रोजी खालील कामांसाठी खालील नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून चवथी लॉटरी भंडारा व गोंदिया जिल्हा करिता (२०१८-१९) बैठक आयोजित करण्यात येत आहे.

| अ.क्र, | कामाचे नाव | रक्कम(सर्व करासहित) | जिल्हा |
|---|---|---|---|
| १) | २२०केव्ही भंडारा (सनफ्लाग) , १३२केव्ही माडगी , १३२केव्ही कारधा , १३२केव्ही टेकेपार उपकेंद्रातील स्वीचयार्ड मधील प्रकाश व्यवस्थेचे साहित्य यांचा पुरवठा, देखभाल व दुरुस्ती करणे | मर्यादित रु. ३ लक्ष | भंडारा |
| २) | १३२केव्ही साकोली, १३२केव्ही लाखांदूर उपकेंद्रातील स्वीचयार्ड मधील प्रकाश व्यवस्थेचे साहित्य यांचा पुरवठा, देखभाल व दुरुस्ती करणे | मर्यादित रु. ३ लक्ष | भंडारा |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | १३२केव्ही गोसेखुर्द , १३२केव्ही आसगाव उपकेंद्रातील स्वीचयार्ड मधील प्रकाश व्यवस्थेचे साहित्य यांचा पुरवठा, देखभाल व दुरुस्ती करणे | मर्यादित रु. ३ लक्ष | भंडारा |
| ४) | २२०केव्ही कवलेवाडा , १३२केव्ही गोंदिया , १३२केव्ही आमगाव उपकेंद्रातील स्वीचयार्ड मधील प्रकाश व्यवस्थेचे साहित्य यांचा पुरवठा, देखभाल व दुरुस्ती करणे | मर्यादित रु. ३ लक्ष | गोंदिया |

अटी व शर्ती :-

१) सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांनी लॉटरीसाठी उपस्थित राहतांना खालील तपशील सोबत आणने बंधनकारक आहे.

अ. महाराष्ट्र शासनाची विद्युत कामासाठीची वैध अनुज्ञाप्ती.
ब. सर्व शासकीय/निमशासकीय/खाजगी आस्थापनेमध्ये एकूण केलेल्या व चालू असलेल्या कामाचा तपशील.
क. रहिवासी प्रमाणपत्र व सर्व मूळ कागदपत्रे.

२) अधिक्षक अभियंता अउदा (संवसु) मंडळ नागपूर या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रहिवासी असलेल्या वैध सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांनाच या लॉटरीमध्ये भाग घेता येईल.

३) लॉटरी पध्दतीने कामे वाटपाच्या वेळेस सदर विद्युत अभियंता हा सुशिक्षित बेरोजगार असावा तसेच तो कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेत नसावा. उपस्थित असलेल्या सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंत्याने दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास त्याला महापारेषण कंपनीने प्रदान केलेला नोंदणी कृत परवाना रद्द करण्यात येईल, तसेच महापारेषण कंपनीने या योजनेन्तर्गत काढलेल्या पुढील कोणत्याही लॉटरी प्रक्रीयेमध्ये सहभागी होता येणार नाही व सदर अभियंत्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

४) या लॉटरी प्रक्रीयेसाठी अउदा (संवसु) मंडळ महापारेषण नागपूर यां कार्यालयात दि. १०.१०.२०१८ पर्यंत नोंदणी झालेले अर्ज ग्राह्य धरण्यात येतील.

सदर लॉटरी बैठक ०२.११.२०१८ (शुक्रवार) रोजी ११:०० वाजता अउदा (संवसु) मंडळ महापारेषण नागपूर या कार्यालयात आयोजित करण्यात आली आहे. वरील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या वैध सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांना आव्हान करण्यात येते कि, त्यांनी नियोजित वेळेस या कार्यालयात उपस्थित राहावे.

सोबत:- लॉटरी बैठकीस पात्र
सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यादी

(सतीश अणे)
अधिक्षक अभियंता
अउदा (संवसु) मंडळ
महापारेषण नागपूर

**प्रत सविनय सादर :-**

1. मा. मुख्य अभियंता अउदा प्रकल्प नि (संवसु) परिमंडळ नागपूर
   ........आपल्या माहितीस्तव सादर

**प्रत सादर:-**

1. कार्यकारी अभियंता अउदा (संवसु) विभाग भंडारा
   ........आपण वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या समिती सदस्यांसोबत नियोजित वेळेस या कार्यालयात उपस्थित राहावे.
2. व्यवस्थापक (विवले) अउदा (संवसु) मंडळ नागपूर
   ........आपण वरीलप्रमाणे निर्धारित केलेल्या समिती सदस्यांसोबत नियोजित वेळेस उपस्थित राहावे.
3. नोटीस बोर्ड

## लॉटरी बैठकीस पात्र सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यादी

## भंडारा व गोंदिया जिल्हा

| अ.क्र. | सुशिक्षित बेरोजगार विद्युत अभियंता यांचे नाव | आस्थापनेचे नाव |
|---|---|---|
| 1. | गोविल ईश्वरचंद्र रेहपाडे | मे. ईश्वमेघ एनर्जी |
| 2. | नवीन श्रावणजी वाडीभस्मे | मे. श्रावण इलेक्ट्रिकल |
| 3. | आदित्य रवींद्र पंधारे | मे. उर्मिला असोसिएटस |
| 4. | राकेश प्रल्हाद खलोदे | मे. खळोदे इलेक्ट्रिकल ॲन्ड कॉट्रक्टर |